MHKO070018752019

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २५.०९.२०१९ |
| नोंदणी तारीख | : | ०३.१०.२०१९ |
| निकाल तारीख | : | १३.१०.२०२१ |
| कालावधी | : | व. म. दि.<br>०२ – ०० – १७ |

**मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर यांच्या न्यायालयात.**

(पीठासीन अधिकारी - बिजेश आ. गायकवाड )

नियमीत दिवाणी दावा क्रं. १८२/२०१९
**CNR NO.MHKO07001875-2019**
निशाणी क्र. -

सुवर्णा तानाजी पोवार,
व.व. ४३, धंदा - घरकाम, ... वादी.
रा. शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

विरुध्द्

जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर, ... प्रतिवादी.
कोल्हापूर.

दावाः हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी.

-=-=-=- =-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

वादीतर्फे वकिल - श्री. यु.व्ही. बिरनाळे.
प्रतिवादी तर्फे वकील - एकतर्फा .

-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

न्या य नि र्ण य
( दि. १३/१०/२०२१ रोजी घोषित करणेत आला. )

१. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी त्यांचे सख्खे भाउ विजय पांडूरंग सावंत यांचा दिवाणी मृत्यु झाला आहे असे हक्कज्ञापन/घोषित होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे दाव्यातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे -

वादी यांचे सख्खे भाउ विजय पांडूरंग सावंत हे दिनांक ०४/०५/२०१० रोजी सकाळी ८.३० वाजणेच्या सुमारास कोणासही काहीही न सांगता घरातून निघून गेले. त्यानंतर १० ते १५ दिवस विजय पांडूरंग सावंत हे परत घरी न आल्याने वादी यांनी ब-याच ठिकाणी शोध घेतला परंतू ते मिळून आले नाहीत. त्यामुळे वादी यांनी शिरोळ पोलीस ठाणे, शिरोळ येथे विजय पांडूरंग सावंत हे बेपत्ता झालेबाबत मिसींग रजिस्टर नं. ८/२०१० दि. २२/०५/२०१० रोजी मिसींग तक्रार दाखल केली. त्यानंतर ही पोलीसांनी तसेच वादी यांनी स्वतः ब-याच ठिकाणी शोध घेतला मात्र त्यांचा ठावठिकाणा मिळून आलेला नाही अगर आजतागायत त्यांचे हस्ते परहस्ते अस्तित्व समजून आलेले नाही.

३. वादी यांचे सख्खे भाउ विजय पांडूरंग सावंत हे गेली ७ वर्षाचे वर बेपत्ता असून त्यांचा शोध लागत नसल्याने ते मयत झाल्याची वादीची समजूत आहे. एखादा इसम ७ वर्षाचे वर आढळून न आल्यास तो मयत झाला आहे असे गृहीतक आहे त्यामुळे विजय पांडुरंग सावंत यांचा दिवाणी मृत्यू झाला आहे असे घोषित/हक्कज्ञापन होवून मिळावे याकरीता सदरचा दावा दाखल केला आहे.

४. प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स मिळूनदेखील ते हजर झाले नाहीत त्यामुळे त्यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला आहे.

५. वादीची कथने विचारात घेवून खालील मुददे निश्चित केलेले आहेत. सदरचे मुददे व त्यावरील निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्रं. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांचे सख्खे भाउ विजय पांडुरंग सावंत हे गेल्या ७ वर्षांपेक्षा जास्त काळापासून बेपत्ता आहेत व ते हयात असल्याचे त्याच्या जवळच्या मित्रांनी, आप्तानी, व नातेवाईकांनी मागील ७ वर्षांत ते हयात असल्याबाबत एकदाही ऐकलेले नाही हे वादीनी सिध्द केले काय ? | .. होकारार्थी. |
| २ | मागणी प्रमाणे हक्कज्ञापन मिळणेस वादी पात्र आहेत काय ? | .. होकारार्थी. |
| ३ | आदेश व हुकूमनामा काय ? | .. अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

मुददा क्रमांक १ ते ३ बाबत -

६. वादीनी दाव्यातील कथने सिध्द करण्यासाठी स्वतः वादी यांनी निशाणी नं. १६ वर सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच वादीतर्फे साक्षीदार श्री. दिपक नाईकबा कोळी यांचे नि. १७ वर शपथपत्र दाखल केले आहे. वादी यांनी नि. १८ ला पुरसिस देवून त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

७. वर्तमानपत्रात काढलेले जाहिर समन्स, शिरोळ पोलीस ठाणे यांनी दिलेला दाखला इ. पुरावादेखील अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर जाहिर समन्सनंतरदेखील कोणीही हजर झाले नाहीत किंवा ते जिवंत असल्याबाबत कोणीही सांगितले नाही.

८. भारतीय पुरावा कायदा कलम १०८ प्रमाणे जर एखादी व्यक्ती हयात असल्याचे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी व मित्रांनी सतत सात वर्षे ऐकले नसेल तर त्या व्यक्तीचा दिवाणी मृत्यु झाल्याचे समजावे असे गृहीतक आहे. वादी यांचे भाउ विजय पांडूरंग सावंत हे गेली सात वर्षाहून अधिक काळपासून घरातून बेपत्ता झाले आहेत, वादीने त्यांचे नातेवाईक व पाहुण्यांकडे ब-याच ठिकाणी चौकशी करुनही त्यांचा ठावठिकाणा मिळून आलेला नाही. वादी तसेच अन्य साक्षीदाराच्या सरतपासाच्या शपथपत्रावरून व दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की, दि. ०४/०५/२०१० पासून विजय पांडूरंग सावंत यांना कोणीही पाहिलेले नाही व ते हयात असल्याचे मागील सात वर्षात वादी व त्यांचे नातेवाईक यांच्या ऐकिवात नाही. पोलीसांनीदेखील त्यांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. वादी तसेच अन्य साक्षीदार यांच्या साक्षीला कोणीही आव्हान दिलेले नाही.

९. वादींनी दाखल केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा पाहता, वसंतराव बळवंत भोसले यांचा दिवाणी मृत्यु घोषित करण्यास मला कोणतीही अडचण वाटत नाही. भारतीय पुरावा कायदा कलम १०८ मधील तरतुदींची पुर्तता झालेली आहे. परिणामी मी सदर मुददा कं.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येतो व मुददा नं.३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

आदेश

१. दावा मंजूर करणेत येतो.

२. विजय पांडूरंग सावंत, रा. शिरोळ, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर यांचा दिवाणी मृत्यु झाल्याचे घोषित/हक्कज्ञापन करणेत येते.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

सही/-
(बिजेश आ. गायकवाड )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.

दिनांकः.१३.१०.२०२१